पाणी व स्वच्छता सहाय्य संस्थेमध्ये जलशक्ती अभियानाच्या समन्वयाकरिता जलशक्ती समन्वय कक्ष स्थापन करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

शासन निर्णय क्रमांकः जलश-०७१९/प्र.क्र.५०/पापु-२५

७ वा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल इमारत
नविन मंत्रालय,लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई ४०० ००१
तारीख: २९ जुलै,२०१९

वाचा :

१) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शा.नि.क्र. ग्रा.पा.यो.-१११०/प्र.क्र.१७८/पापु-०७, दि. १२ मार्च, २०१२

२) कॅबिनेट सचिव, केंद्रशासन यांचे अशा पत्र क्र. DO. No. 021/9/1/2018-CA-IV, Dt. 25th June, 2019.

३) सचिव, भारत सरकार पेयजल व स्वच्छता विभाग व जलशक्ती मंत्रालय यांचे अ.शा. पत्र क्र. DO.No. 2/2/S (DWS)/19, dtd.: 04th July, 2019

४) केंद्रशासनाच्या जलशक्ती अभियानाच्या अंमलबजावणी करिता निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सुचना.

प्रस्तावना :

केंद्रशासनाने जलसंधारण व कार्यक्षम जलसिंचनाकरिता जलशक्ती अभियान हा कालमर्यादेतील कार्यक्रम राबविण्याचे नियोजित केले आहे. या अंतर्गत भारतातील सुमारे १५०० दुष्काळग्रस्त तालुक्यांमध्ये जलसंधारण व जलसिंचनाच्या माध्यमातुन हे अभियान राबविले जाणार आहे. ग्रामस्वराज्य अभियानाच्या धर्तीवर सदर अभियान दोन टप्प्यांमध्ये राबविण्याचे नियोजत असून पहिला टप्पा दि. ०१ जुलै, २०१९ ते दि. १५ सप्टेंबर, २०१९ या कालावधीमध्ये राबविला जाणार आहे. तर दुसरा टप्पा दि. ०२ ऑक्टोबर, २०१९ ते दि. ३० नोव्हेंबर, २०१९ या कालावधीत राबविला जाणार आहे. या अभियानाचा आशय राज्य स्तरावर एकात्मीक पध्दतीने सर्व संबंधित विभागाच्या समन्वयाने नियोजनबध्द आराखडा तयार करुन लोक चळवळीच्या माध्यमातुन जलसंधारणांची कामे करणे व कार्यक्षम सिंचन व्यवस्था तयार करुन शाश्वत पाणी उपलब्ध करुन देणे असा आहे. याकरिता केंद्रशासन, राज्यशासन, जिल्हा स्तर, तालुकास्तर अशा स्तरांवर या अभियानाचे नियोजन, प्रसिध्दी, पीक आराखडा, छतावरील पाणी संकलन इ. बाबींचे समन्वयन, याविषयी माहितीचे संकलन, त्यावर संस्करण करणे जिल्हास्तरावरील कामांचा आढावा घेऊन त्याचे अहवाल तयार करणे इ. बाबींकरिता राज्यस्तरावर पाणी व स्वच्छता सहाय्य संस्थेमध्ये जल शक्ती अभियान समन्वयन कक्ष, (Cell) स्थापन करण्याची बाब विचाराधीन होती.

शासन निर्णय :

पाणी व स्वच्छता सहाय्य संस्थेमध्ये जल शक्ती अभियान समन्वयन कक्ष, (Cell) स्थापन करण्यात येत असून पुढीलप्रमाणे पाणी व स्वच्छता सहाय्य संस्थेतील अधिकारी / कर्मचारी यांचा समावेश या कक्षात करण्यात येत आहे.

रचना

<u>जल शक्ती अभियान समन्वयन कक्षाची रचना</u>

अ.क्र .	पदाचे नाव	संख्या
१	कार्यकारी अभियंता- सहाय्यक अभियंता श्रेणी / उपअभियंता /।	१
२	शाखा अभियंता	१
३	डेटा एंट्री ऑपरेटर	१

<u>कक्षाचे कार्य व जबाबदारी</u>

i. केंद्र शासन व राज्य शासन यादरम्यान समन्वयाकरिता स्थापन करण्यात येणाऱ्या राज्य स्तरीय समितीच्या कामकाजाचे नियमन व समन्वयन करणे.

ii. राज्यातील निवड केलेल्या जिल्हयामधील जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी व कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद यांच्याकडून अभियानासंबंधित जलसंधारण आराखडे अंतिम करण्याकरिता पाठपुरावा करणे.

iii. राज्यस्तरावरुन जलशक्ती अभियानाच्या आढाव्याकरिता नियोजित केलेल्या दुरचित्रवाणी परिषदेचे नियोजन करणे.

iv. संबधित बैठकांचे नियोजन व नियमन करणे.

v. केंद्र शासनाने उपलब्ध करुन दिलेले विविध Formats भरुन घेण्याकरिता जिल्हयांना पाठपुरावा करणे.

vi. राज्य समन्वयक अधिकारी (State Nodal Officer) यांना अभियानांतर्गत निवड केलेल्या जिल्हयांमधील विहित केलेल्या कामांकरिता उद्दिष्टांक निश्चित करण्याकरिता माहितीचे संकलन जिल्हयांकडून करुन घेणे.

vii. केंद्र शासनाच्या पोर्टल वरील राज्याची जलशक्ती अभियानाची प्रगती व त्याकरिताचे घटक (निधी स्त्रोत व वितरण,जिल्हा जल संवर्धन आराखडा, या अभियानाकरिता प्रसार माध्यमांच्या वापराचे नियोजन, जिल्हा स्तरावरील व तालुकास्तरावरील अधिकाऱ्यांनी अभियांनांतर्गत

काम सुरू असलेल्या स्थळी दिलेल्या क्षेत्रीय भेटींच्या अहवालांचे संगणकीय संकलन इ.) साधण्याकरिता जिल्हयांकडे पाठपुरावा करणे.

viii. केंद्र शासनाच्या जल शक्ती अभियानाच्या अंमलबजावणीकरिता निर्गमित करण्यात आलेल्या मार्गदर्शक सुचनांप्रमाणे(परिशिष्ठ ३) राज्य समन्वयक अधिकाऱ्यांनी केलेल्या क्षेत्रिय भेटींचा अहवाल व प्रतिसाद (feedback) पोर्टलवर अपलोड करणे.

ix. केंद्रशासनाच्या सुचनांप्रमाणे वेळोवळी काम पहाणे.

सदर कक्ष स्थापन करण्याकरिता कोणत्याही प्रकारे नवीन पद निर्मिती करण्यात येणार नसून वासोमध्ये प्रतिनियुक्ताने कार्यरत असलेल्या अधिकारी व कर्मचारी यांच्या सेवांचे उपनियोजन वरील परिच्छेदात नमुद केलेल्या कामांकरिता केले जात आहे . उपरोक्त अधिकारी व कर्मचारी संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था यांच्या नियंत्रणाखाली काम पहातील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०७२९१४३९२९०६२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

RAJASHREE RAHUL SARANG

Digitally signed by RAJASHREE RAHUL SARANG
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=5c072530c0f2940404764b5dc00127bb99ecf9466431dc1a1a4e123b229e41c0, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=2b9a36fae4ec39263a2a8df78b48fc28b92b165e239815b0cdcef1a4b5928579, ou=WSSD, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=RAJASHREE RAHUL SARANG
Date: 2019.07.29 16:44:42 +05'30'

(राजश्री सारंग)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.मंत्री , पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे खाजगी सचिव मंत्रालय, मुंबई.
२) मा .राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे खाजगी सचिव , मंत्रालय, मुंबई.
३) मा. अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
४) सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.
५) संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा,पुणे
६) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
७) संचालक, पाणी व स्वच्छता सहाय संस्था(वासो), बेलापूर, नवी मुंबई.
८) सर्व सह सचिव/उप सचिव/मुख्य अभियंता तथा वि.का.अ. पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई

९) मुख्य प्रशासकीय अधिकारी,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.
१०) सर्व मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,
११) सर्व अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,
१२) सर्व कार्यकारी अभियंता , महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,
१३) सर्व अवर सचिव व कक्ष अधिकारी,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई
१४) निवड नस्ती - पा.पु.२५